वर्ष- ११ | अंक- ३५ | मुंबई, मंगळवार, १५ जुलै ते २१ जुलै २०२५ | पृष्ठ-४ | मूल्य २/- रुपये

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

POSTAL REGISTRATION No. PLG/205/2025- 2027

# पोलीस बातमी पत्र

POLICE BATMI PATRA

पोलीस बातमी पत्र

● संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG 2

मऊ आणि फुललेली पोळी बननायची जाणून घ्या

3 → निवडणूक आयोगाची मनमानी!

स्मशानभूमी नसल्याने संतप्त गावकरी वाशिम जिल्ह्यात प्रेत थेट ग्रामपंचायतीत ← 4

www.policebatmipatra.in | policebatmi | police batmi patra | policebatmipatra | policebatmipatra@gmail.com

## ‘मतदान यंत्र सज्ज ठेवा..’, राज्य निवडणूक आयुक्तांचे निर्देश;



**लवकरच इलेक्शनचा धुरळा उडणार? सर्व प्रकारची पूर्वतयारी करून इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांची प्राथमिक तपासणी करण्यात यावी व ती मतदानासाठी सज्ज करावीत , असे निर्देश राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी आज इथे दिले.**

**मुंबई,** महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकांसाठी आवश्यक ती सर्व प्रकारची पूर्वतयारी करून इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांची प्राथमिक तपासणी करण्यात यावी व ती मतदानासाठी सज्ज करावीत , असे निर्देश राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी आज येथे दिले. महानगरपालिकांच्या आगामी निवडणुकांच्या प्राथमिक तयारीसंदर्भात विभागीय आयुक्त आणि महानगरपालिका आयुक्त यांची आज व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी ते बोलत होते. राज्य निवडणूक आयोगाचे सचिव सुरेश काकाणी यांच्यासह आयोगाचे विविध अधिकारी यावेळी उपस्थित होते. श्री. वाघमारे म्हणाले की, राज्यातील सर्व २९ महानगरपालिकांच्या निवडणुकांच्या तयारीबाबत आतापासूनच दक्ष राहण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे ऐनवेळी होणारी धावपळ टळू शकेल. मतदार संख्या, मतदार केंद्र, उपलब्ध इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र आणि उपलब्ध मनुष्यबळ इत्यादींची आपल्या स्तरावरील उपलब्धता लक्षात घ्यावी. मतदान यंत्रांची प्राथमिक तपासणी झाल्यानंतर आवश्यक संख्येचा अंदाज घेता येईल. मनुष्यबळाबाबत विभागीय आयुक्तांनी समन्वयकाची भूमिका घेऊन सर्व महानगरपालिका आयुक्तांसोबत वेळोवेळी आढावा घ्यावा. सर्व संबंधितांशी समन्वय आणि नियोजनपूर्वक तयारी केल्यास आपल्याला या निवडणुका मुक्त, निर्भय व पारदर्शक वातावरणात पार पाडणे सहज शक्य होईल. श्री. काकाणी म्हणाले की, मतदाराची संख्या लक्षात घेऊन मतदान केंद्रांची अचूक संख्या निश्चित करता येईल.

त्या आधारे पुढील नियोजन करणे सुलभ होईल. मतदान केंद्राचा अचूक अंदाज आल्यावर इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांच्या आवश्यकतेबाबतही नियोजन करता येईल. मनुष्यबळाचाही अंदाज येईल. विभागीय आयुक्तांच्या समन्वयातून आजुबाजूच्या जिल्ह्यातील मनुष्यबळ उपलब्ध करून घेता येईल. एकूणच तयारीबाबतची सर्व तपशीलवार व अद्ययावत माहिती तयार ठेवावी. त्याबाबत वेळोवेळी आढावा घेण्यात येईल. त्यावेळी ही माहिती सादर करावी.

## ‘हॅलो, मी विश्वास नांगरे पाटील बोलतोय...’ निवृत्त अधिकाऱ्याला ७८ लाखांना लुटलं



**मुंबई** ,‘आर्टिफिशिअल इंटेलिजन्स’द्वारे खोटा चेहरा बनवून नांगरे पाटील बोलत असल्याचे भासवत सेवानिवृत्त अधिकाऱ्याला लुटल्याची घटना उघडकीस आली आहे. महाराष्ट्रातील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे अतिरिक्त पोलीस महासंचालक आणि वरिष्ठ आयपीएस अधिकारी विश्वास नांगरे पाटील यांचा एआय चेहरा वापरुन एका निवृत्त अधिकाऱ्याची फसवणूक झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. ही घटना छत्रपती संभाजीनगर येथे घडली आहे. ‘आर्टिफिशिअल इंटेलिजन्स’द्वारे खोटा चेहरा बनवून नांगरे पाटील बोलत असल्याचे भासवत सेवानिवृत्त अधिकारी एकनाथ जोशी यांच्याकडून ७८ लाख लुटल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी ९ जुलै रोजी क्रांती चौक पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दहशतवाद्यांच्या खात्यावरुन तुमच्या बँक खात्यात २० लाख जमा झाल्याचा बनाव रचत सेवानिवृत्त अधिकाऱ्याला सायबर गुन्हेगारांनी ६ दिवसांत तब्बल ७८ लाख ६० हजारांना लुटले. धक्कादाकाय बाब म्हणजे, तक्रारदाराचा विश्वास बसण्यासाठी सायबर गुन्हेगारांनी आयपीएस अधिकारी विश्वास नांगरे पाटील यांच्या विभागातून बोलत असल्याचे सांगितले. इतकेच नाही तर ४ जुलै रोजी व्हिडीओ कॉलवर नांगरे पाटील यांच्यासारख्या दिसणाऱ्या वक्तीने सवांद साधत त्यांना विश्वासात घेतलं. ७७ वर्षीय तक्रारदार, जे विभागीय आयुक्तालयातून सेवानिवृत्त झाले आहेत, त्यांना २ जुलै रोजी एका पोलीस गणवेशातील व्यक्तीचा व्हिडिओ कॉल आला. या व्यक्तीने आपले नाव संजय पिसे असून, आपण आयपीएस अधिकारी विश्वास नांगरे-पाटील यांचे सहकारी असल्याची बतावणी केली. त्याने जोशी यांना सांगितले की, त्यांच्या पत्नीच्या बँक खात्यात २ कोटी रुपयांचा बेहिशेबी व्यवहार झाला असून, त्याचा थेट संबंध दहशतवादी अब्दुल सलाम याच्यासोबत आहे. अब्दुल सलाम याच्या खात्यातून जोशींच्या खात्यात २० लाख रुपये जमा झाल्याचे सांगत, राष्ट्रीय तपास यंत्रणेने गुन्हा दाखल केला असून त्यांना तात्काळ अटक करण्यात येईल, अशी धमकी दिली. त्यामुळे घाबरलेल्या सेवानिवृत्त अधिकाऱ्याने ७८ लाख ६० हजार रुपये ७ जुलैपर्यंत सायबर गुन्हेगारांनी दिलेल्या तीन बँक खात्यांवर पाठवले. तक्रारदाराचे सर्व पैसे बँक ऑफ महाराष्ट्राच्या बँक खात्यावर जमा झाले. पवन मेहुरे, करण कुन्हे आणि आशिक नागफुसे यांच्या नावे असलेल्या बँक खात्यात हे पैसे वळते झाले आहेत. हे खाते गोंदिया व मुंबईतील शाखांमध्ये असल्याचे पोलिस तपासात निष्पन्न झाले आहे. या संपूर्ण प्रकरणावर आता गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस या संदर्भात सखोल तपास करत असल्याची माहिती पोलीस उपायुक्त प्रशांत स्वामी यांनी दिली आहे. सायबर गुन्हेगारांनी वापरलेली ही अत्यंत पद्धतशीर आणि मानसिक छळवणूक करणारी फसवणुकीची पद्धत नागरिकांसाठी धोक्याची घंटा आहे. अशा प्रकारच्या कोणत्याही संशयास्पद कॉल्सना बळी न पडण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.

## वीस हजार विद्यार्थ्यांना एसटीच्या पासचा लाभ

**पालघर, वार्ताहर :** जून पासून शाळा व महाविद्यालयात शिक्षण घेत असलेल्या जिल्ह्यातील हजारो विद्यार्थी विद्यार्थिनींना एसटीचे पास थेट शाळेत व महाविद्यालयात मिळत आहेत. १६ जून पासून आतापर्यंत तब्बल वीस हजार शालेय पासचे वाटप पूर्ण झाले आहे यामध्ये अहिल्याबाई होळकर योजनेअंतर्गत विद्यार्थिनींना मोफत पास उपलब्ध करून देण्यात आले आहेत. पालघर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थी विद्यार्थिनी शालेय तसेच महाविद्यालयीन शिक्षण घेण्यासाठी शहरांमध्ये असलेल्या शाळांमध्ये व महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेण्यासाठी जात असतात अनेक वेळा बसची सेवा उपलब्ध होत न सल्याने खाजगी वाहनाने जाणाऱ्या विद्यार्थ्यांची ही संख्या मोठ्या प्रमाणात आहे. मात्र गावातील विद्यार्थी शाळेत जाण्यासाठी बसचा वापर करत आहेत या विद्यार्थ्यांना पास काढण्यासाठी अगोदर डेपो मध्ये जाऊन पास काढावा लागत होता आता त्यांना थेट शाळेत पास उपलब्ध होत असल्यामुळे त्यांचा तो त्रास वाचला आहे. जून महिन्याच्या कालावधीत ३६४५ विद्यार्थ्यांना पास देण्यात आलेत. आणि अहिल्याबाई होळकर अंतर्गत १५६४३ विद्यार्थिनीना मोफत पासेस वाटप देण्यात आले .तसेच मानव विकास अंतर्गत विद्यार्थिनींना २५७४ मोफत पासचे वाटप करण्यात आले. १६ जूनपासून नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या सत्रातील शाळा सुरू झाल्या आहेत. घरापासून शाळेपर्यंत जाण्यासाठी शासनाने विद्यार्थ्यांना एसटीच्या माध्यमातून ६६.६६ टक्के सवलत दिली आहे, म्हणजेच केवळ ३३.३३ टक्के रक्कम भरून विद्यार्थ्यांना मासिक पास काढता येतो. या अंतर्गत ३,६४५ विद्यार्थ्यांना त्यांच्या शाळेत जाऊन एसटी कर्मचाऱ्यांनी पास वितरित केले. त्याचप्रमाणे, शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर योजनेअंतर्गत बारावीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थिनींना मोफत एसटी पासचे वितरण करण्यात आले. या अंतर्गत १५,६४३ विद्यार्थिनींना त्यांच्या शाळेत जाऊन पास वितरित करण्यात आले, तर मानव विकास योजनेअंतर्गत २,५४७ विद्यार्थिनींना मोफत पास मिळाले. यापूर्वी विद्यार्थी-विद्यार्थिनींना एसटीच्या पास केंद्रावर जाऊन रांगेत उभे राहून पास घ्यावे लागत होते किंवा गटागटाने आगारात जाऊन आगार व्यवस्थापनाकडून पास घेतले जात असत. मात्र आता विद्यार्थ्यांना पाससाठी रांगेत ताटकळत उभे राहावे लागणार नाही. त्यांच्या शाळा-महाविद्यालयांनी पुरवलेल्या यादीनुसार एसटीच्या कर्मचाऱ्यांकडून त्या विद्यार्थ्यांना आणि विद्यार्थिनींना त्यांचे एसटी पास थेट शाळेत देण्यात येत आहेत यामुळे विद्यार्थिनीमध्ये वेगळाच उत्साह दिसून येत आहे. तर प्रवासा अभावी शाळेला खंड पडणार नसल्याने शालेय व्यवस्थापनाकडून देखील समाधान व्यक्त करण्यात येत आहे.




## पसंतीचे सिडकोचे घर घेणाऱ्यांसाठी खुश खबर! घरांची किंमत २५ ते ३० टक्कांनी कमी होणार?



**मुंबई** , माज्या पसंतीचे सिडकोचे घर ही योजना जाहीर करण्यात आली. सिडकोनी ही योजना राबवली. मात्र या घरांच्या किंमती सर्वाच शेवटी सांगितल्या. त्यामुळे गोरगरीबांसाठी असणाऱ्या या घरांच्या किंमती गगनाला भिडलेल्या होत्या. खाजगी बिल्डरांच्या किंमती ऐवढ्या या किंमती होत्या. त्यामुळे हे घर घेणं अनेकांच्या आवाक्या बाहेर होतं. अशा स्थितीत लॉटरीमध्ये घर मिळून ही अनेकांनी ही घरं वाढत्या किंमती मुळे सरेंडर केली आहे. या योजनेला अत्यल्प प्रतिसाद मिळाला. त्यामुळे आता ही घरं पडून आहेत. या घरांच्या किंमतीचा मुद्दा विधान परिषदेत गाजला. आमदार विक्रांत पाटील, शशिकांत शिंदे यांनी हा मुद्दा लक्षवेधी द्वारे मांडला. शिवाय या घरांच्या किंमती ५० टक्कांनी कमी कराव्यात अशी मागणी केली. त्याला उद्योग मंत्री उदय सामंत यांनी उत्तर दिले. उपस्थित केलेल्या प्रश्नाला यावेळी उद्योग मंत्री उदय सामंत यांनी उत्तर दिले. घरांच्या किंमती बाबत अनेक वेळा प्रश्न उपस्थित केला गेला आहे. ज्यावेळी किंमती जास्त असतात त्यावेळी म्हाडाने दर कमी केले आहे. सिडको बाबतीत ही सरकार त्या दृष्टीने विचार करेल. गृहनिर्माण मंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली एक तातडीची बैठक घेतली जाईल. अधिवेश काळात ही बैठक व्हावी असा आपला प्रयत्न असेल. या बैठकीत सिडको घरांच्या दरा बाबत सकारात्मक निर्णय घेतला जाईल. या घरांच्या किंमती कमी करण्याबाबत सरकार सकारात्मक असल्याचं ही त्यांनी सांगितलं.

## मद्यविक्री परवान्यांची खैरात! राज्यात ३२८ नव्या दुकानांची भर, अजित पवारांकडे सूत्रे



**मुंबई** , राज्यात ३२८ नवे मद्यविक्री परवाने दिले जाणार असल्याची माहिती समोर आली आहे. हे नवे परवाने दुकानांना नाही तर कंपन्यांना दिले जाणार आहे. गेल्या ५० वर्षांपासून राज्यातील वाईन शॉप परवान्यांवर असलेली स्थगिती आता उठण्याची शक्यता आहे. राज्याचा महसूल वाढवण्यासाठी राज्य सरकारकडून नव्याने ३२८ नवे मद्यविक्री परवाने दिले जाणार आहेत. विदेशी मद्यनिर्मिती परवाना देण्यासाठी अजित पवार यांच्या नेतृत्वाखालीच समिती नेमण्यात येणार आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, राज्यात ३२८ नवे मद्यविक्री परवाने दिले जाणार यामध्ये प्रत्येकी एका कंपनीला मद्यविक्रीचे ८ परवाने मिळणार आहेत. तसेच हे परवाने भाड्याने देण्याचीही मुभा असणार आहे. या विदेशी मद्यनिर्मिती परवाना देण्यासाठी नेमलेल्या समितीत अजित पवार यांचा समावेश आहे. महत्त्वाचं म्हणजे कॅपोव्हिटेज या मद्यनिर्मितीच्या कंपनीच्या संचालकपदी जय पवार आहेत, त्यामुळे हितसंबंधाचा धोका असल्याचा आरोप विरोधक करत आहेत.

हे राज्याच्या महसूल वाढीसाठी शासन ३२८ नवे मद्यविक्री परवाने देण्यात येणार आहेत. राज्यात जुना मद्यविक्री परवाना विकत घेण्यासाठी १० कोटी मोजावे लागतात. मात्र आता नवीन परवाना घेण्यासाठी कंपन्यांना शासनाकडे फक्त 1 कोटी जमा करावे लागणार आहेत. तसेच मद्यविक्री कंपन्यांनी भरलेली 1 कोटींची रक्कम विनापरतावा असेल. मात्र अजित पवार हे विदेशी मद्यनिर्मितीचे परवाने देण्यासाठी नेमलेल्या समितीच्या अध्यक्षपदी असल्याने विरोधकांकडून टीका होण्याची शक्यता आहे. याबाबत आता अजित पवार यांनीही महत्त्वाची प्रतिक्रिया दिली आहे. आपण एक नियम केला आहे की परवाने द्यायचे असतील तर विधिमंडळाला विश्वासात घेतल्याशिवाय देवू नका. दुसऱ्या राज्यात परवाने वाढत आहेत पण आपण नियमत राहून सगळं करतो. परंतु आपली पद्धत वेगळी आहे जर शॉप स्थलांतर करायचं असेल तर आपण नियमांनुसार परवानगी देतो, पण सगळ नियमांत होते. महिलांनी मागणी केली तर आपण बंद करतो दुकाने असं अजित पवार यांनी म्हटलं आहे

## राज्यातील प्रत्येकाला हक्काचे घर मिळणार; ग्रामीण भागासाठी ८० हजार कोटींची गुंतवणूक

**मुंबई** प्रत्येकाला घर देणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य असेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

केंद्र सरकारने प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत महाराष्ट्राच्या ग्रामीण भागासाठी ३० लाख घरकुलांचे उद्दीष्ट मंजूर केले असून राज्यातील प्रत्येकाला हक्काचे घर देण्यात येईल, या माध्यमातून ग्रामीण भागात ८० हजार कोटींची गुंतवणूक होणार असून प्रत्येकाला घर देणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य असेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

ग्रामविकास व पंचायत राज व राज्य व्यवस्थापन कक्ष ग्रामीण- गृहनिर्माण विभागाच्यावतीने श्री छत्रपती क्रीडा संकुल, म्हाळुंगे बालेवाडी येथे प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) लाभार्थी मेळावा व महाआवास अभियान राज्यस्तरीय पुरस्कार वितरण कार्यक्रमप्रसंगी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी केंद्रीय ग्रामविकास मंत्री शिवराज सिंग चौहान, उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार, फलोत्पादन व रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले, ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे, राज्यमंत्री योगेश कदम, ग्राम विकास व पंचायत राज विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, प्र.विभागीय आयुक्त कविता द्विवेदी, केंद्रीय ग्रामविकास मंत्रालयाचे सहसचिव गया प्रसाद, राजाराम दिघे,जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील आदी उपस्थित होते.

फडणवीस म्हणाले, २०११ मध्ये झालेल्या सर्वेक्षणात बेघर असलेल्यांना घरे देण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजना सुरू करण्यात आली. २०१७ मध्ये हे उद्दीष्ट पुरेसे नसल्याने अधिक उद्दीष्ट मंजूर करण्याची विनंती केंद्र सरकारकडे करण्यात आली. आवास प्लस योजनेत नोंदणीची सुविधा केंद्राने दिल्याने ३० लाख बेघराची नोंद करण्यात आली. केंद्राने २० लाख घरकुलांना मंजूरी दिली. त्यापैकी १० लाख घरांचा पहिला हप्ता ग्रामविकास विभागाने जमा केला आहे.

आता नव्याने १० लाख घरकुलांचे पत्र मिळाल्याने जुन्या यादीपैकी एकही लाभार्थी घरकुलाशिवाय राहणार नाही. राज्य शासनाने घरकुलासाठी ५० हजार रुपये अधिक देण्याचा निर्णय घेतला. दीनदयाल उपाध्याय घर खरेदी अर्थसहाय्य योजनेअंतर्गत एक लाख रुपये देण्याचा निर्णय घेतला. बेघरमुक्त महाराष्ट्राची संकल्पना राबविण्याचे प्रयत्न होत आहेत.



‘लखपती दिदी’ योजनेच्या माध्यमातून महिलांची आर्थिक उन्नती होत आहे. राज्यात मागील वर्षी २६ लाख ‘लखपती दिदी’ झाल्या असून यावर्षी २५ लाख महिला लखपती दिदी होतील. अशा एक कोटी महिलांना ‘लखपती दिदी’ करण्याचे राज्याचे उद्दीष्ट आहे. प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत लाडक्या बहिणीच्या नावाने घर देण्यात यावे, असे आवाहनही फडणवीस यांनी केले.

यावेळी ‘अमृत ग्राम महा आवास अभियान-महाराष्ट्राची गौरवगाथा’ या पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले. या पुस्तिकेत पुरस्कार विजेत्यांची यशोगाथा देण्यात आली आहे. प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण आणि राज्य पुरस्कृत आवास योजनेअंतर्गत चांगली कामगिरी करणाऱ्या विभाग, जिल्हा, तालुका आणि ग्रामपंचायतींना मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले. तसेच प्रतिनिधीक स्वरूपात महा आवास योजनेअंतर्गत मंजूर घरकुलांच्या चावीचे लाभार्थ्यांना वितरण करण्यात आले.

### प्रत्येक पात्र लाभार्थ्याला घरकुल देणार : केंद्रीय मंत्री शिवराज सिंह चौहान

राज्याच्या ग्रामीण भागातील प्रत्येकाला हक्काचे घर मिळावे यासाठी केलेला संकल्प आज पूर्ण होत आहे. १० लाख घरकुलांचे उद्दीष्ट मंजूर केल्यानंतर एकही गरीब घरावाचून वंचित राहणार नाही. या घरकुलांच्या माध्यमातून गरिबांना केवळ घर मिळणार नाही, २० लाख घरांच्या माध्यमातून होणाऱ्या ६५ हजार कोटींच्या गुंतवणूकीमुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळेल. अद्यापही २०१८ च्या यादीतून नाव सुटलेल्यांना घरे देण्यासाठी सर्वेक्षण करावे, नव्या सर्वेक्षणानंतर प्रत्येक बेघर माणसाला घर देण्यात येईल. आता दुचाकी असलेल्या, अडीच एकर बागायती किंवा ५ एकर जिरायती शेतजमीन असलेल्यांना किंवा १५ हजार रुपये मासिक उत्पन्न असलेल्यांनाही नव्या सर्वेक्षणात घरकुल मंजूर करण्यात येईल.

### गरिबांना स्वाभिमान, सुरक्षितता, स्थैयार्चा आधार : उपमुख्यमंत्री अजित पवार

प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत यावर्षी देखील लाखो नागरिकांना हक्काचे घर मिळणार आहे. महाआवास अभियान राज्य शासनाचे अभिनव पाऊल होते. यात घरासोबत वीज, शुद्ध पाणी, रस्ता, गॅस जोडणी, स्वच्छता गृह आणि मनरेगा अंतर्गत रोजगार आदी मिळत असल्याने घर समृद्ध आणि राहण्याजोगे बनले आहे. प्रधानमंत्री आवास योजना, रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, अटल बांधकाम आवास योजना, पारधी आवास योजना, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना, मोदी आवास योजनांसाठी निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही.

# सखी

## मऊ आणि फुललेली पोळी बनवायची जाणून घ्या योग्य पद्धत



पोळी हे एक असे खाद्य आहे जे जवळ जवळ सर्व भारतीयांच्या घरात बनवली जाते. पोळी खाल्याशिवाय लोकांचे पोट भरत नाही. अनेक घरी लंच आणि डिनरमध्ये पोळी खाल्ली जाते. पण अनेक लोकांचे म्हणणे असते की पोळी बनवणे सोप्पे नसते. लोक पोळी बनवण्याची कृती जाणतात आणि रोज पोळी बनवतात. पण त्यांची तक्रार असते की त्यांची पोळी फुलत नाही आणि मऊ देखील बनत नाही. अनेक वेळेस लोक भिजवलेली कणिक फ्रीजमध्ये ठेवतात. ज्यामुळे पोळी मऊ बनत नाही. म्हणून फ्रिजमध्ये ठेवलेल्या कणकेची मऊ आणि फ ललेली पोळी कशी बनवावी जाणून घ्या.

**फ्रीजमध्ये ठेवलेल्या कणकेची मऊ पोळी बनवायची टिप्स**

जर मळलेली कणिक फ्रीजमध्ये ठेवली असेल तर, पोळी बनवण्यापूर्वी गोळा परत एकदा माळावा. याकरिता कोमट पाण्याचा उपयोग करावा, फ्रीजमध्ये ठेवलेल्या कणकेच्या गोळ्यावर एक लेयर तयार होते. या लेयरला काढण्यासाठी कणकेचा गोळा परत मळावा. गोळा माळताना थोडे थोडे पाणी लावावे. तसेच गोळ्यातून फ्रीजचा थंडावा गेल्यानंतर पोळी लाटावी. तसेच फ्रीजम धून काढलेला गोळा परत मळायला वेळ नसेल तर पोळी बनवल्यावर ती गॅस मोठा करून शेकू नये. असे केल्याने पोळी पापडसारखी कडक होईल.

फ्रीजमधून कणिक बाहेर काढून लगेच पोळी बनवू नये. पहिले कणकेला रूम टेम्परेचर वर ठेवावे. फ्रीजमधून कणिक बाहेर काढून लगेच पोळी बनवल्यास तिची चव देखील बदलते. जास्त दिवस फ्रीजमध्ये ठेवलेल्या कणकेच्या गोळ्याची पोळी खा ऊ नये. कारण ती नरम होत नाही आणि चव देखील चांगली लागत नाही. तसेच उन्हाळ्यात शिळा झालेला कणकेचा गोळा हा नुकसानदायक असतो. म्हणून फ्रीजमध्ये जास्त दिवस ठेवलेल्या कणकेच्या गोळ्याची पोळी खाऊ नये.

## पांढरे केस 30 मिनिटात काळे होतील या १ नेचरल हेयर मास्कच्या मदतीने

कालांतराने केस पांढरे होणे ही सामान्य गोष्ट आहे, परंतु आजकाल लोकांचे केस लहान वयापासूनच पांढरे होण्यास सुरुवात झाली आहे. कमी वयात केस पांढरे होण्यामुळे अनेकदा तुमच्या आत्मविश्वासावरही परिणाम होतो. त्यामुळे केस पांढरे होण्याच्या समस्येपासून प्रत्येकाला दूर राहायचे असते.

जर तुम्हाला केस पांढरे होण्याच्या समस्येचा सामना करावा लागत असेल तर विविध रसायने असलेले केस रंग वापरण्याऐवजी नैसर्गिक उपायांचा अवलंब करणे चांगले.

जेव्हा तुम्ही तुमच्या केसांवर केमिकल युक्त गोष्टी वापरता तेव्हा तुमचे केस खूप खराब होऊ लागतात. अशा परिस्थितीत केसांमध्ये इतरही अनेक प्रकारच्या समस्या उद्भवू लागतात. जर तुम्हाला केसांचे पांढरे होणे कमी करायचे असेल तर घरीच एक प्रभावी हेअर पॅक बनवा. या हेअर पॅकच्या मदतीने केस नैसर्गिकरित्या काळे करता येतात. चला जाणून घेऊया केस पांढरे होण्याच्या समस्येपासून कशी सुटका मिळेल?

घरी तयार करा हिबिस्कस फ्लॉवर हेअर पॅक

**आवश्यक साहित्य-** वाळलेली जास्वंदाची फुले - अर्धा चमचा

दही - २ चमचे

कॉफी पावडर - २ मोठे चमचे


व्हिटॅमिन ई कॅप्सूल - २ मोठे चमचे

एलोवेरा जेल - १ मोठा चमचा

कृती- सर्व प्रथम वाळलेल्या जास्वंदाची फुले पूर्णपणे कुटून घ्या. यानंतर त्यात दही, कॉफी पावडर, व्हिटॅमिन ई कॅप्सूल, कोरफड जेल इत्यादी घटक मिसळा. यानंतर केसांचे दोन भाग करा आणि तयार केलेले हेअर मास्क मुळापासून टोकापर्यंत लावा.

यानंतर एक टॉवेल घेऊन गरम पाण्यात बुडवा आणि पिळून घ्या. आता ते डोक्यावर लावा आणि सुमारे ३0 मिनिटे सोडा. नंतर केस पाण्याने धुवा. तुम्हाला हवे असल्यास तुम्ही सौम्य शॅम्पूच्या मदतीने तुमचे केस देखील स्वच्छ करू शकता. यामुळे नैसर्गिकरित्या केस काळे होण्यास मदत होते.

केस काळे करण्यासाठी तुम्ही या खास हेअर मास्कचा वापर करू शकता. तथापि लक्षात ठेवा की जर तुमचे केस खूप पांढरे होत असतील तर अशा परिस्थितीत एकदा डॉक्टरांचा सल्ला घ्या. यासोबतच तुमच्या आहार आणि जीवनशैलीकडेही लक्ष द्या.



## घरी बनवलेल्या नारळाच्या क्रीमचा उपयोग, त्वचा होईल मऊ



**वातावरण बदलत आहे, थंडीचे दिवस जावून आता उष्णता वाढायला लागेल. दिवसा पडणाऱ्या कडक उन्हामुळे अनेकांनी स्किन केयर लावणे देखील सुरु केले आहे. या वातावरणात त्वचेची काळजी घेणे महत्वाचे आहे. काळजी घेतली नाही तर भविष्यात समस्या निर्माण होऊ शकतात. त्वचेची काळजी घ्यायची असेल तर घरीच नारळाचे क्रीम कसे बनवावे शिकून घ्या.**

**साहित्य**

१ कप नारळाचे तेल

१ चमचा नैसर्गिक एलोवेरा जेल

१ ते २ थेंब एसेंशियल ऑइल

**कृती**

नारळाचे क्रीम बनवण्यासाठी एका वाटीमध्ये वितळलेले नारळाचे तेल आणि ताजे एलोवेरा जेल घ्या. आता याला चांगल्याप्रकारे मिक्स करा. म्हणजे हे चांगले एकत्र होतील. मग यामध्ये काही थेंब एसेंशियल ऑइल टाका. तुम्हाला हवे असल्यास याकरिता लॅवेंडर, पेपरमिंट किंवा साइट्रस तेल निवडू शकतात. तसेच चांगल्या प्रकारे मिक्स करा. तुमचे नारळाचे क्रीम तयार आहे. कोरडी त्वचा असणाऱ्या लोकांसाठी हे क्रीम फायदेशीर असते. या क्रीमचा उपयोग केल्यास तुमची त्वचा मऊ राहिल. क्रीम बनवतांना साहित्याचे प्रमाण व्यवस्थित पहावे. कारण दहा दिवसांच्या वरती याचा उपयोग वर्ज्य असेल. तसेच पाहिले थोडीशी त्वचेला लावून पहा यासाठी की क्रीम तुम्हाला सूट होत आहे का.

## एलोवेरा जेलमध्ये कधीही मिसळू नये या ३ गोष्टी

### त्वचेसाठी फायद्याऐवजी नुकसानदायक



**आपल्या त्वचेची काळजी घेण्यासाठी अनेक लोक कोरफड वापरतात. काही लोक एकट्या कोरफडीचा वापर करतात तर काही लोक अनेक गोष्टी मिसळून लावतात. पण आज आम्ही तुम्हाला अशा काही गोष्टींबद्दल सांगणार आहोत ज्या कोरफडीमध्ये मिसळल्याने त्वचेला फायदा होण्याऐवजी नुकसान होते. कोरफड आपल्या त्वचेसाठी आणि केसांसाठी खूप फायदेशीर मानली जाते, त्यात आढळणारे अँटीऑक्सिडेंट आणि अँटी-बॅक्टेरियल गुणधर्म आपली त्वचा निरोगी ठेवतात. कोरफडमध्ये व्हिटॅमिन ए आणि व्हिटॅमिन ई देखील चांगल्या प्रमाणात आढळतात, ज्यामुळे तुमची त्वचा निरोगी राहण्यास मदत होते. आज आम्ही तुम्हाला अशा ३ गोष्टींबद्दल सांगणार आहोत ज्या कोरफडीमध्ये मिसळल्यास तुमच्या त्वचेसाठी खूप हानिकारक ठरू शकतात.**

**१. लिंबाचा रस**

लिंबाचा रस मिसळून कोरफड जेल लावात असाल तर चुकूनही अशी चूक करू नये. लिंबूमध्ये अम्लीय गुणधर्म आढळतात, त्यामुळे ते आपल्या त्वचेला हानी पोहोचवू शकते. कोरफड आपली त्वचा चमकदार बनवण्याचे काम करते, तर लिंबूमध्ये उलट गुणधर्म असतात. त्यामुळे चुकूनही कोरफडीमध्ये लिंबू मिसळू नका. यामुळे तुम्हाला पुरळ उठणे, लालसरपणा आणि खाज सुटणे यासारख्या समस्या होऊ शकतात.

**२. टूथपेस्ट**

त्वचा स्वच्छ करण्यासाठी दात स्वच्छ करण्यासाठी काम करणारी टूथपेस्ट आपण कधीही वापरू नये. आजकाल आपण अशा अनेक उपायांबद्दल ऐकले असेल ज्यामध्ये टूथपेस्टच्या मदतीने त्वचा सुधारण्यासाठी प्रयोग केले जातात. जर तुम्ही एलोवेरा जेल मिसळून टूथपेस्ट लावली तर तुमच्या त्वचेला गंभीर नुकसान होऊ शकते. अशा उपायांचा अवलंब करण्यापूर्वी तुम्ही तज्ज्ञांचे मत नक्कीच घ्यावे.

**३. बेकिंग सोडा**

कपडे स्वच्छ करण्यासाठी बेकिंग सोडा मोठ्या प्रमाणात वापरला जातो. दातांचा पिवळेपणा दूर करण्यासाठी बेकिंग सोडा देखील वापरता येतो हे तुम्ही ऐकले असेल. परंतु बरेच लोक त्वचा सुधारण्यासाठी कोरफड जेलमध्ये बेकिंग सोडा मिसळण्याचा सल्ला देतात. जर तुम्ही तुमची त्वचा उजळ करण्यासाठी बेकिंग सोडा वापरणार असाल तर सावधान, असे केल्याने तुमच्या त्वचेला खूप नुकसान होऊ शकते.

## चेहऱ्यावर कोणते सीरम कोणत्या वेळी लावावे, दिवस आणि रात्रीचे सीरम वेगळे आहेत का ते जाणून घ्या



सीरम हे हलके, पाण्यासारखे द्रव आहे जे त्वचेचे पोषण करण्यास आणि त्वचेच्या विविध समस्या दूर करण्यास मदत करते. त्यातील सक्रिय घटक त्वचेत खोलवर जातात आणि त्वचेच्या समस्यांवर प्रभावीपणे उपचार करतात.

पण तुम्हाला माहित आहे का की दिवसा आणि रात्री वेगवेगळ्या वेळी वेगवेगळ्या प्रकारचे सीरम लावावेत? कोणता सीरम कधी आणि का लावावा ते जाणून घेऊया.

### दिवसा कोणता सीरम लावावा?

**व्हिटॅमिन सी सीरम:** सकाळी व्हिटॅमिन सी सीरम लावणे चांगले कारण ते त्वचेला अतिनील किरणांपासून संरक्षण करण्यास मदत करते आणि कोलेजन उत्पादनास प्रोत्साहन देते.

**नियासीनामाइड सीरम:** नियासीनामाइड सीरम सकाळी देखील लावता येते. ते त्वचेचा रंग समतोल करते आणि सूज कमी करते.

**अँटिऑक्सिडंट सीरम:** अँटिऑक्सिडंट सीरम सकाळी लावण्यासाठी देखील योग्य आहे कारण ते पर्यावरणीय प्रदूषणामुळे होणाऱ्या नुकसानापासून त्वचेचे संरक्षण करते.

### रात्री कोणता सीरम लावावा?

**रेटिनॉल सीरम:** रात्रीच्या वेळी रेटिनॉल सीरम लावणे चांगले कारण सूर्यप्रकाशाच्या संपर्कात आल्यास ते त्वचा संवेदनशील बनवू शकते. हे कोलेजन उत्पादनास प्रोत्साहन देते आणि सुरकुत्या कमी करते.

**हायल्यूरॉनिक ॲसिड सीरम:** हायल्यूरॉनिक ॲसिड सीरम त्वचेला हायड्रेट करण्यास मदत करते आणि जेव्हा त्वचा दुरुस्ती आणि पुनरुत्पादनाच्या प्रक्रियेत असते तेव्हा रात्रीच्या वेळी लावणे चांगले.

**पेप्टाइड सीरम:** पेप्टाइड सीरम रात्री देखील लावता येते कारण ते त्वचा मजबूत करते आणि सुरकुत्या कमी करते.

### सीरम लावण्याची योग्य पद्धत

**चेहरा स्वच्छ करा:** सीरम लावण्यापूर्वी चेहरा पूर्णपणे स्वच्छ करा.

**टोनर वापरा:** टोनर वापरल्याने त्वचेची पीएच पातळी संतुलित राहते.

**सीरम लावा:** सीरमचे काही थेंब घ्या आणि चेहऱ्यावर हलक्या हाताने मसाज करा.

**मॉइश्चरायझर लावा:** सीरम लावल्यानंतर मॉइश्चरायझर वापरा.

सीरम तुमच्या त्वचेसाठी एक उत्तम उत्पादन असू शकते, परंतु ते योग्यरित्या वापरणे महत्वाचे आहे. वेगवेगळे सीरम त्यांच्या नियुक्त वेळी लावावेत. जर तुम्ही तुमच्या त्वचेसाठी योग्य सीरम निवडला आणि ते योग्यरित्या वापरले तर तुम्हाला नक्कीच निकाल आवडतील.

**अस्वीकरण:**

**या लेखांमध्ये दिलेली माहिती आणि उपाय सामान्य माहितीवर आधारित आहे. या माहितीची पूर्णता, विश्वासार्हता आणि अचूकता याबाबत दैनिक 'मुंबई लक्षदीप' कोणतीही हमी देत नाही. अधिक माहितीसाठी संबंधित तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.**

## संपादकीय

# निवडणूक आयोगाची मनमानी !



संपादक दिपक मोरेश्वर नाईक




लवकरच बिहार विधानसभेच्या निवडणुका आहेत. निवडणुकांआधीच्या मतदार याद्या सुधारणा मोहीम पार पडल्यानंतर, सर्व मतदार याद्या रद्दबातल ठरवून, आयोगाने नव्याने याद्या बनवण्याचे जाहीर केले. या अशक्यप्राय आणि अलोकतांत्रिक निर्णयाविरुद्ध न्यायालयात दावा दाखल झाला आहे. कोणत्याही निवडणुकांआधी, संबंधित मतदार याद्या सुधारण्याची मोहीम निवडणूक आयोग नियमितपणे राबवित असते. त्यानुसार आगामी ऑक्टोबर महिन्यात राज्य विधानसभेच्या निवडणुका होऊ घातलेल्या बिहार राज्यातही आयोगाने व्यापक मोहीम राबवून याद्या सुधारण्याचे काम पार पाडले. या याद्यांसंदर्भात पुढील सुधारणांसाठी मागच्याच महिन्यात राज्यातील सर्व विरोधी पक्षीयांना विश्वासात घेत, १८ मुद्दे नक्की करण्यात आले. त्यानंतर अचानक ज्याचा उल्लेखही वरील १८ मुद्द्यांमध्ये नाही त्या आधारे आयोगाने २४ जून रोजी फतवा काढला की, राज्यातील सर्व सुधारित याद्या रद्द करून पुढील महिनाभरात मतदार याद्यांचे 'विशेष सखोल पुनरीक्षण' करून नव्याने याद्या तयार कराव्या. प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ता आणि निवडणूक विश्लेषक योगेंद्र यादव म्हणतात त्याप्रमाणे, हा फतवा केवळ आश्चर्यकारक किंवा अभूतपूर्वच नाही तर अंमलात आणण्यास अशक्यप्राय आणि अलोकतांत्रिकही आहे. आधी भ्रष्टाचाराच्या नावाने नोटबंदी, नंतर लॉकडाऊनच्या काळातील देशबंदी आणि आता नव्या निवडणूक नावनोंदणी प्रक्रियेतून, अनेकांना व्होटबंदी अशी ही चाल आहे. राज्यातील विरोधी पक्षीयांनी तर याला आयोगाचा मोठा घोटाळा म्हटले आहे.

याआधी २००३ साली राज्यात व्यवस्थित सूचना देऊन, निवडणुकांच्या सुमारे वर्षभर आधी मतदार याद्यांच्या सखोल पुनरीक्षणाचे काम पूर्ण करण्यात आले होते. यावेळी मात्र दिल्लीतल्या आयोगाच्या अधिकाऱ्यांनी २४ जून रोजी १८ पानी आदेश काढला आणि २५ जून ते २५ जुलै अशा अवघ्या एका महिन्यात हे काम पूर्ण करण्याचे, अंमलात आणण्यास अशक्यप्राय असे वेळापत्रक जाहीर केले आहे. सर्वसाधारणपणे याद्यांचे पुनरीक्षण करताना त्यात संशोधन केले जात नाही तर केवळ याद्यांची रचना अद्ययावत करण्यात येते. यावेळी मात्र आधीच्या याद्या रद्द करून, संपूर्णपणे नवीन याद्या बनवण्याचे अभूतपूर्व धोरण जाहीर करण्यात आलेले आहे. मतदार नोंदणीची जबाबदारी आजवर सरकारवर असे. या आदेशाने ती जबाबदारी व्यक्तिगत नागरिकावर टाकण्यात आली असून, नोंदणी करताना प्रथमच पुराव्यादाखल दस्तावेज अनिवार्य करण्यात आले आहेत. कोणाही राजकीय पक्षासोबत विचारविनिमय न करताच सरकारने हा आदेश घिसाडघाईने काढला आहे. २४ जूनच्या दिल्लीतील या आदेशानुसार लागलीच दुसऱ्या दिवसापासून- २५ जून रोजी राज्यात फॉर्म्सची छपाई, ब्लॉक स्तरावरील हजारो कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण, घराघरात फॉर्म्स पोहोचविणे, घर बंद असल्यास तीन वेळा घरी चक्कर मारणे, सर्व राजकीय पक्षांनी ब्लॉक स्तरावरील एजंट्सची नेमणूक करून त्यांचे प्रशिक्षण, घराघरातून भरलेले फॉर्म्स जमा करणे आणि त्यांचे संगणकीकरण करणे आदी कामे अवघ्या एका महिन्यात- २५ जुलैपर्यंत पूर्ण करण्याचे अशक्यप्राय वेळापत्रक, पीएमओच्या तालावर काम करणाऱ्या आयोगातील अधिकाऱ्यांच्या डोक्यातून निघाले आहे. इथे हे लक्षात घ्यायला हवे की, आयोगाने अधूनमधून मतदार याद्यांची तपासणी करणे अजिबात अयोग्य नाही; मात्र त्यासाठी यावेळी जाहीर केलेल्या अतर्क्य कार्यपद्धतीला लोकांचा विरोध होतो आहे तो आयोगाच्या पुढील घोषणांमुळे! ज्यांच्याबद्दल संशय आहे अशांनाच फॉर्म्स भरावे लागतील असे अजिबात नाही. ज्यांची नावे २००३ सालच्या पुनरक्षित यादीत होती व त्याच नावाने ती जानेवारी २०२५ च्या यादीतही असतील, तर अशा मतदारालाही फॉर्म भरावाच लागेल. आपला अलीकडचा फोटोही द्यावा लागेल. २००३ च्या यादीत ज्या पानावर आपले नाव असेल त्या पानाची फोटोकॉपीही फॉर्मसोबत द्यावी लागेल. ज्यांची नावे २००३ च्या यादीत असायला हवी होती, पण नाहीयेत अशा सर्वांना नव्याने आपले जन्मस्थान आणि जन्मतारखेचे पुरावे द्यावे लागतील. वयवर्ष २० ते ४० मधील युवकांना आपले आणि आपल्या पालकांपैकी एकाचे पुरावे द्यावे लागतील. २० वर्षांच्या आतील नवमतदारांना आपले आणि आपल्या आई व वडील दोघांचे जन्मस्थान आणि तारखेचे पुरावे द्यावे लागतील. आई-वडिलांची नावे २००३च्या यादीत असतील, तर तो पुरावा पुरेल, मात्र स्वतःचे पुरावे द्यावेच लागतील. आयोगाच्या यादीत जे पुरावे ग्राह्य म्हणून दिलेले आहेत त्यात बहुतेकांकडे असतील अशा अनेक दस्तावेजांचा उल्लेखच नाही. बिहारमध्ये ८८ टक्के लोकांकडे असलेले आधार कार्ड, आयकर विभागाचे पॅन कार्ड, निवडणूक आयोगाने दिलेले मतदाता कार्ड, रेशन कार्ड किंवा रोजगार हमी कार्ड यापैकी कोणताही पुरावा आयोगाला चालणार नाही! आयोगाने जे ११ पुरावे ग्राह्य मानले आहेत त्यापैकी काही बिहारमध्ये लागूच होत नाहीत वा पहायलाही मिळत नाहीत. काही पुरावे फार थोड्या लोकांकडेच असतात. उदाहरणार्थ पासपोर्ट (२.४ टक्के), जन्मतारखेचा दाखला (२.८ टक्के), सरकारी नोकरी किंवा पेन्शनधारी ओळखपत्र (पाच टक्के) किंवा जातीचा दाखला (१६ टक्के). उरलेले मॅट्रिक परीक्षा पास केल्याचे प्रमाणपत्र फक्त ५० टक्के लोकांकडेच असेल! ही यादी नीट पाहिली तर एक गोष्ट स्पष्ट आहे, की जे शिक्षित व नोकरीपेशात आहेत अशा लोकांनाच आवश्यक दाखले जमवणे शक्य आहे. ज्यांना शिकण्याची संधी मिळू शकली नाही, अशा महिला, स्थलांतरित व ग्रामीण मजूर, दलित आदिवासी व अन्य मागासवर्गीय हे आयोगाला आवश्यक दाखले देण्यात कमीच पडणार आणि त्यांची नावे मतदार यादीतून कायमची हद्दपार होणार! संविधान बनवताना शिक्षण ही मतदार असण्याची अट नव्हती. ती लादण्याचाच हा डाव आहे!

हे सर्व काम पूर्ण करण्यासाठी आयोगाने आपल्या १८ पानी आदेशात जरी ३ महिन्यांचा कालावधी दिला असला तरी प्रत्यक्ष काम पूर्ण करण्यासाठी पहिला एकच महिना असून, २५ जुलैनंतरचे दोन महिने हे या कामात आलेल्या तक्रारींच्या निवारणासाठी ठेवलेले आहेत. याचा अर्थ, ज्या कुणा मतदाराचा २५ जुलैच्या आत फॉर्म जमा होणार नाही, तेही मतदार यादीतून हद्दपार! बिहारची आजची लोकसंख्या आहे १३ कोटींपैकी आठ कोटी वयस्क. हे मतदार व्हायला हवेत. २००३च्या सुधारित यादीत तीन कोटी मतदारांची नोंद आहे. उरलेल्या पाच कोटी जनतेला आपल्या नागरिकत्वाचे दाखले गोळा करत फिरावे लागणार! यापैकी अर्ध्या म्हणजे सुमारे अडीच कोटी लोकांकडे आयोगाने ग्राह्य मानलेले पुरावे नसणार. याचा अर्थ आयोगाच्या या 'विशेष सखोल पुनरीक्षण' कार्यक्रमातून समाजातील शेवटच्या स्तरावरील कोट्यवधी लोकांच्या हातात आज शिल्लक असलेला एकमेव मताचा अधिकारही हिरावून घेण्याचे हे षडयंत्र आहे! या पुन्हा तपासणीमुळे राज्यातील बांगलादेशीय मुसलमान घुसखोरांची समस्या निकालात निघेल, असा दावा केला जातोय. बिहारमध्ये मुसलमान घुसखोर बांगलादेशीयांची समस्या अस्तित्वातच नाही. इथे घुसखोरी आहे. नेपाळमधील हिंदूंची. त्यामुळे, पुन्हा तपासणीतून हजारो घुसखोर बांगलादेशी आणि नेपाळी यांची समस्या जरी निकालात निघू शकली, तरी कोट्यवधी भारतीयही या तडाख्यात सापडून आपला मतदानाचा हक्क गमावू शकतात! बिहारमध्ये सुरू करून ही नागरिकता-चाचणी योजना अख्ख्या देशात राबवण्याचा सरकारचा इरादा लक्षात घेऊन, निवडणूक आयोगाच्या या मनमानीबाबत वेळीच आवाज उठवणे आवश्यक आहे.

## शहरी नक्षलवाद रोखण्यासाठी जनसुरक्षा विधेयक

महाराष्ट्राचे आराध्य दैवत असणाऱ्या श्री विठ्ठलाच्या दर्शनासाठी पंढरीकडे निघालेल्या वारकऱ्यांमध्ये शहरी नक्षलवाद्यांनी शिरकाव केल्याचा मुद्दा सध्या ऐरणीवर आला आहे. वारकरी संघटनांकडूनही याविषयी सावधानतेचा इशारा देण्यात आला होता. शहरी नक्षलवाद्यांच्या कारवायांची मोठी व्याप्ती पाहूनच महायुती सरकारने शहरी नक्षलवादाविरोधात महाराष्ट्र जनसुरक्षा विधेयक तयार केले आहे.

शहरी नक्षलवाद्यांच्या कारवायांचे गांभीर्य अजून शिक्षित जनतेलाही उलगडलेले नाही. सरकारविषयी, संविधानाने निर्माण केलेल्या संस्थांविषयी, यंत्रणांविषयी असंतोष निर्माण करणे हे शहरी नक्षलवादाचे मुख्य उद्दिष्ट आहे. या असंतोषाद्वारे हिंसाचार निर्माण होईल, अशा पद्धतीचे वातावरण तयार करण्यासाठी जनतेच्या भावना भडकवणाऱ्या अफवा पसरवल्या जातात. हे उद्योग कमी पडतात म्हणून की काय, शहरी नक्षलवादी मंडळी प्रत्यक्ष हिंसाचार घडवून आणण्यासही मागेपुढे पाहत नाहीत.

शहरी नक्षलवाद्यांनी तरुणाईला आपल्या पकडीत आणण्याचे लक्ष्य ठेवले आहे. काही वर्षांपूर्वी पुणे जिल्ह्यातील कोरेगाव-भीमा येथे झालेल्या हिंसक घटना आठवून पहा. कोरेगाव लढाईच्या २००व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमावेळी उपस्थितांवर अचानक दगडफेक सुरू करण्यात आली. ही दगडफेक करणाऱ्यांच्या हातामध्ये भगवे झेंडे होते. ही दगडफेक करून चेहरा झाकलेली ही मंडळी कुठे गायब झाली, हे कळले नाही; मात्र दगडफेक करून त्यांनी समाजाच्या दोन गटांमध्ये संघर्ष निर्माण करण्याचे काम केले होते.

शहरी नक्षलवादाचे काम मुख्यतः अफवा पसरवणे आणि त्या माध्यमातून सामान्य जनतेत असंतोष निर्माण करणे हे आहे. दहशतवादी आणि अतिरेक्यांपेक्षाही शहरी नक्षलवादाचा धोका मोठा आहे. अतिरेकी गोळीबार,



बॉम्बस्फोटातून भारतीय नागरिकांच्या हत्या घडवून आणतात. शहरी नक्षलवादी मात्र भारतीयांनाच परस्परांच्या विरोधात उभे करतात. भारतीयांमध्ये संघर्ष पेटवून समाज विघटन करणे आणि त्याद्वारे सरकार अस्थिर करणे, अशी शहरी नक्षलवाद्यांची कार्यपद्धती आहे.

महाराष्ट्रात आणि देशात काँग्रेसप्रणित संयुक्त पुरोगामी आघाडीची (यूपीए) सत्ता असताना शहरी नक्षलवाद्यांविरोधात कारवाई केली गेली होती. त्यावेळचे केंद्रीय गृहमंत्री पी. चिदंबरम यांनी देशाला शहरी नक्षलवादापासून असलेल्या धोक्याबाबत संसदेत भाष्य केले होते. शहरी नक्षलवाद हा शब्दप्रयोग चिदंबरम यांनीच प्रथम वापरला होता.

अलीकडच्या काळात काँग्रेसचे शहरी नक्षलवाद्यांबाबत मतपरिवर्तन झाले आहे. काँग्रेसचे युवराज राहुल गांधी यांनी काढलेल्या 'भारत जोडो' यात्रेमध्ये सहभागी झालेल्या १८० संघटनांपैकी ४० संघटना शहरी नक्षलवाद्यांशी संबंधित होत्या. ही यात्रा मागासवर्गीयांच्या वस्त्यांमधून जात असताना घरोघरी जाऊन ह्यसंविधान खतरे में हैह्नचा प्रचार केला गेला.

दुर्गम भागातील आदिवासींच्या मनात आम्ही स्वतंत्र आहोत, वनक्षेत्राचे मूळ मालक आम्हीच आहोत, सरकारने येथे येऊ नये, विकासकामे करू नयेत अशा पद्धतीचा प्रचारही या संघटनांनी मोठ्या प्रमाणात केला आहे. २०१२-१३ मध्ये त्यावेळचे गृहमंत्री आर. आर. पाटील यांनी राज्यातील ४८ नक्षलवादी संघटनांची यादी जाहीर केली होती. त्याच काळात नक्षलवाद्यांच्या फ्रंटल संघटना म्हणजेच शहरी नक्षलवादी संघटना, असा शब्दप्रयोग वापरात आला. शहरी नक्षलवाद्यांचे पुण्यात प्रशिक्षण शिबिर झाले होते, असे तत्कालीन गृहमंत्री आर. आर. पाटील यांनी विधानसभेतच सांगितले होते.

राज्यातील महायुती सरकारने जनसुरक्षा विधेयकाबाबत विचारविनिमय करण्यासाठी अनेक बैठका घेतल्या. या विधेयकावर १३ हजार एवढ्या प्रचंड संख्येने सूचना प्राप्त झाल्या आहेत. या सर्व सूचनांचा विचार करून या विधेयकात काही सुधारणा करण्यात आल्या आहेत.

पंढरपूरकडे निघालेल्या यात्रेमध्ये शहरी नक्षलवादी घुसल्याचे पुरावेही वारकरी संघटनांनी सरकारकडे दिले आहेत. बंडातात्या कराडकर यांच्यासारख्या वारकरी संघटनेतील जाणत्या व्यक्तीने पत्रकार परिषद घेऊन यात्रेतील शहरी नक्षलवाद्यांच्या शिरकावाविषयी चिंता व्यक्त केली होती. भोळ्याभाबड्या वारकऱ्यांमध्ये गैरसमज निर्माण करून, अफवा पसरवून लक्षावधींच्या उपस्थितीत होणाऱ्या आषाढी यात्रेला हिंसाचाराचे गालबोट लागावे, असा शहरी नक्षलवाद्यांचा हेतू आहे. लक्षावधींच्या गर्दीत अफवा पसरवून चेंगराचेंगरीसारख्या दुर्घटना घडवून आणण्याच्या दृष्टीने काही संघटना नेहमीच कार्यरत असतात.

भारताविरुद्ध उघड युद्ध पुकारणाऱ्या पाकिस्तानच्या समर्थनास असलेल्या अतिरेक्यांपेक्षाही देशाला या फ्रंटल नक्षली संघटनांकडून मोठा धोका आहे. केंद्रीय गृहमंत्रालयाने नक्षलवादी भागातील संघटनांचे कंबरडे मोडले आहे. त्यामुळेच अनेक नक्षली संघटनांनी नक्षलवाद्यांविरोधातील कारवाई सरकारने थांबवावी, अशी याचना केली होती.

जनसुरक्षा विधेयकाबाबत समाजातील विविध घटकांमध्ये गैरसमज निर्माण करण्याचे काम पद्धतशीरपणे चालू आहे. या विधेयकाबाबत खोटी माहिती प्रसारित करून पत्रकारांमध्येही घबराट पसरवण्याचे काम काही शक्ती सातत्याने करत आहेत. महायुती सरकारने हे गैरसमज दूर करण्यासाठी प्रयत्न चालू ठेवले आहेतच.

विद्यार्थी, युवा बेरोजगार, विकासापासून वंचित राहिलेले समाजघटक, आदिवासी, भूमिहीन व गरीब शेतकरी यांच्यावर लक्ष केंद्रित करून शहरी नक्षलवादी कारवाया केल्या जातात. या समाजघटकांसाठी संघर्ष समित्या, कृती समित्या तयार करून आंदोलने उभी केली जातात. या आंदोलनात हिंसाचार करून पोलीस यंत्रणेने गोळीबार करण्यास प्रवृत्त व्हावे, अशा पद्धतीचे वातावरण निर्माण करणे, या उद्देशाने शहरी नक्षलवाद्यांच्या संघटना सतत कार्यरत असतात.

सांस्कृतिक कार्यक्रम, पथनाट्ये, सोशल मीडियाच्या आडून तरुणाईला सरकारविरोधात आणि सरकारी यंत्रणांविरोधात भडकवण्याचे काम या संघटनांकडून मोठ्या खुबीने केले जाते. शहरी नक्षलवाद्यांच्या कार्यपद्धतीचा सखोल अभ्यास करूनच जनसुरक्षा विधेयक तयार करण्यात आले आहे. अंतर्गत अशांतता निर्माण करून संविधान संकटात आणणाऱ्या या संघटनांना जनसुरक्षा कायद्यामुळे चाप बसेल, यात काही शंका नाही.

## नोकरीचा चंद्र

विविध विभागांमधील रिक्त पदांचा आढावा घेऊन राज्य सरकार लवकरच महाभरती करील, ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा या नोकऱ्यांसाठी इच्छुक उमेदवारांच्या आशा उंचावणारी आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा मुहूर्त यामागे असला, तरी कोणत्याही मार्गाने नोकरी मिळावी, या प्रतीक्षेत असलेल्या बेरोजगारांना त्यातून दिलासा मिळू शकतो. अर्थात, जाहीर केल्याप्रमाणे सर्व विभागांमधील आढावा घेऊन रिक्त पदे आणि भरतीचा तपशील समोर येण्यास काही काळ लागेल. कर्मचारी संघटनांच्या आक्षेपांनुसार यांपैकी किती पदांवर थेट सरकारी नोकरी मिळणार आणि किती पदे कंत्राटी असतील, हासुद्धा मोठा प्रश्न आहे. सरकारने सर्व विभागांना दिलेल्या सूचनांप्रमाणे कर्मचाऱ्यांचा आकृतिबंध, नियुक्ती नियमांत सुधारणा आणि अनुकंपा तत्त्वावरील पदे यांतून नेमकी माहिती समोर येणार असून, त्यानंतर ही महाभरती होईल. विधानसभेच्या गेल्या निवडणुकीपूर्वी ७५ हजार पदांच्या भरतीची घोषणा करून, प्रत्यक्षात एक लाख पदे भरल्याचा दावा करून फडणवीस यांनी या नव्या भरतीचे सूतोवाच केले आहे. सरकारी नोकऱ्यांचे तरुणांमधील आकर्षण, प्रत्यक्षात निर्माण होणारी पदे आणि त्यांवरील भरती, हे प्रमाण पूर्वीपासूनच कमालीचे व्यस्त आहे. त्यातही राज्य सरकारपुढील आर्थिक मर्यादा पाहता, सरकारी नोकरी दुर्मीळच ठरली आहे. सन १९८०मध्ये तर आर्थिक अडचणींमुळे शून्याधारित अर्थसंकल्प मांडून सरकारने भरतीच बंद केली होती. गेल्या काही काळात ती पुन्हा सुरू झाली असली, तरी कोणत्याही सरकारी विभागात रिक्त पदांचे प्रमाण तब्बल ३० ते ३५ टक्के इतके आहे, असे सांगण्यात येते. 'सरकारी काम अन् सहा महिने थांब,' असा अनुभव सर्वसामान्य नागरिकांना येत असला, तरी त्यामागे अपुरा कर्मचारीवर्ग, हेसुद्धा महत्त्वाचे कारण आहे. गेल्या वर्षीच्या माहितीनुसार विविध सरकारी विभाग व निमसरकारी संस्था यांत सुमारे पावणेतीन लाख पदे रिक्त आहेत. स्थानिक स्वराज्य संस्था आणि शिक्षकांचा विचार केला, तर ही संख्या याहून मोठी आहे. नागरिकांचा थेट संबंध येणाऱ्या पोलिस, आरोग्य; तसेच महसूल अशा विभागांमध्ये अपुऱ्या कर्मचाऱ्यांचा फटका अंतिमतः नागरिकांना बसत आहे. परिणामी सरकारी कार्यक्षमताही कमालीची घटली आहे. त्यामुळेच उपलब्ध कर्मचाऱ्यांवरील वाढता ताण, शिक्षकांअभावी शिक्षणाचा बोजवारा आणि सरकारी योजना-प्रकल्पांची कूर्मगती, याचा अनुभव नित्याचा झाला आहे. या तुलनेत राज्य सरकारकडून दर वर्षी होणारी भरती साधारण दोन हजारांच्या घरात, म्हणजे आत्यंतिक तुटपुंजी आहे. मागणीच्या तुलनेत अर्थ खात्याकडून नगण्य संख्येने भरतीला परवानगी मिळते. आरक्षणातील जागा आणि अनुकंपा तत्त्वावरील पदांच्या भरतीमध्येही अनेक अडचणी आहेत. त्यातच दिल्लीपासून गल्लीपर्यंत 'मिनिमम गव्हर्न्मेंट'च्या घोषणेखाली 'डाउनसाइझिंग' करीत, नोकऱ्या देण्यापासून अंग काढून घेण्याचेच धोरण सर्व सरकारांनी अवलंबिले, हे वास्तव आहे. दुसरीकडे सर्व क्षेत्रांतील खासगीकरण-कंत्राटीकरणाचे सरकारमध्येही चांगलाच शिरकाव झाला आहे. सरकारने गाजावाजा केलेल्या एक लाखांच्या भरतीपैकीही बहुतांश पदे कंत्राटी असल्याचा कर्मचारी संघटनांचा आक्षेपही दुर्लक्षित करता येणार नाही. बेरोजगारीचा प्रश्न साऱ्या देशातच दिवसेंदिवस उग्र बनत आहे. विविध समाजांतील आरक्षणाची आंदोलने, परप्रांतीयांविरोधातील रोष या सर्वांच्या मुळाशी रोजगार हिरावले जात असल्याची भावनाही मोठी आहे. मात्र, हा प्रश्न म्हणजे आतबट्ट्याची शेती, घटती औद्योगिक मागणी, कौशल्यांचा अभाव अशा अत्यंत गुंतागुंतीच्या आर्थिक-सामाजिक दुष्टचक्राचा भाग असून सरकारी भरती, ही त्यावरील मलमपट्टीच आहे. देशातील एकूण रोजगारांमध्ये सरकारी नोकऱ्यांचे प्रमाण दोन ते तीन टक्के इतकेच असले, तरी त्या नोकरीतील सुरक्षितता, अधिकार आणि मानसन्मानामुळे युवकांना त्याचे आकर्षण वाटणे साहजिक आहे. मात्र, सध्या राज्य सरकारच्या उत्पन्नापैकी ५५ ते ६० टक्के वाटा पगारावर खर्च होत असताना आणि उत्पन्नाचे स्रोत दिवसेंदिवस आक्रसत असताना रोजगार देण्याच्या राज्य सरकारच्या क्षमतेवरही मर्यादा आहेत. हे वास्तव लक्षात घेऊन, खासगी क्षेत्रातील नोकऱ्या किंवा स्वयंरोजगाराची मानसिकता तरुणांमध्ये निर्माण केली पाहिजे. रोजगारनिर्मिती हे सरकारचे काम नसले, तरी रोजगार मिळेल अशी व्यवस्था आणि वातावरण निर्माण करण्याची जबाबदारी निःसंशय सरकारचीच आहे. त्यासाठी नवनवे उद्योग सुरू होण्याकडे लक्ष पुरविणे आणि तरुणांना नवी कौशल्ये उपलब्ध करून देणे, हा दूरचा वाटला, तरी शाश्वत उपाय आहे. पूर्वी कविवर्य नारायण सुर्वे यांना 'भाकरी'मध्ये चंद्र दिसला होता; आता ही जागा 'नोकरी'ने घेतल्याचे चित्र महाराष्ट्राच्या घराघरांत आहे. त्यातून निर्माण होणाऱ्या असंतोषाची दखल सरकारला घ्यावीच लागेल.

## मराठी अस्मितेवर पाय देताना...

आम्ही दुकाने बंद ठेवली तर मराठी लोक उपाशी मरतील, अशी मग्रुरी दाखवणाऱ्या अमराठी व्यापाऱ्यांचा निषेध करण्यासाठी मीरा रोड येथे मराठी भाषिकांकडून मंगळवारी मोर्चा काढण्यात आला. काही तासांच्या या मोर्चाने सबंध महाराष्ट्राचे वातावरण ढवळून निघाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने हा मराठी भाषिकांचा मोर्चा दडपण्यासाठी ज्या काही हालचाली केल्या ते पाहता मोरारजी देसाई यांची आठवण झाली, असे म्हटले तर वावगे ठरू नये. कारण मराठी भाषिकांचा हा मोर्चा निघूच नये म्हणून मोर्चासाठी पुढाकार घेणाऱ्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पदाधिकाऱ्यांना आदल्या रात्रीच पोलिसांकडून त्यांच्या घरातून उचलण्यात आले. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात मराठी लोकांचा आवाज दडपण्यासाठी त्यावेळचे मुख्यमंत्री मोरारजी देसाई यांनीदेखील आपल्याकडील शासकीय दमन यंत्रणेचा यथेच्छ वापर केला होता. मीरा रोड येथे अमराठी व्यापाऱ्यांनी आपले शक्तिप्रदर्शन करण्यासाठी मोर्चा काढला. त्यात काहींनी आम्ही पाच दिवस दुकाने बंद ठेवली तर मराठी लोक उपाशी मरतील अशी उद्दाम भाषा केली. यानंतर पोलिसांनी त्यांच्यावर काय कारवाई केली याची कल्पना नाही. मात्र मराठी माणसाने मोर्चाची घोषणा केली तर त्यांच्यावर प्रतिबंध, कलम १४४, जमावबंदी, नेत्यांना अटक, नोटिसा बजावण्यात आल्या. मोर्चासाठी जमलेले जणू दहशतवादी आहेत असे समजून त्यांना पकडून डांबण्यात आले. महिलांनाही दया-माया दाखवली गेली नाही. मीरा-भाईंदरमध्ये फक्त १५ टक्के मराठी लोक आहेत, अशी दर्पोक्ती येथील स्थानिक आमदार नरेंद्र मेहता नेहमीच करतात. त्यामुळे इथल्या अमराठी व्यापाऱ्यांचे बळ वाढले असावे, हे त्यांनी काढलेल्या मोर्चातून दिसून आले. मुख्यमंत्र्यांनी पोलिसांची जमावबंदी आणि मनसे पदाधिकाऱ्यांवरील कारवाई हा स्थानिक पातळीवर घेतलेला निर्णय म्हणून हात झटकण्याचा प्रयत्न केला. पण असे निर्णय घेणाऱ्यांवर गृहविभाग काही कारवाई करणार का, याचे उत्तर दिले नाही. त्यांच्याच पक्षाचे मंत्री आशिष शेलार मराठीचा आग्रह धरणाऱ्यांची तुलना पहलगाममधील दहशतवाद्यांशी करतात. तिथे धर्म विचारून मारले आणि इथे भाषा विचारून मारले जात आहे, असे म्हणतात. भाषेचा हा वाद शेलारांनी दहशतवादापर्यंत नेऊन पोहोचवला आणि मराठी भाषेचा आग्रह धरणाऱ्यांची बरोबरी पहलगाममध्ये अमानुष नरसंहार करणाऱ्या दहशतवाद्यांशी केली. भाजप खासदार निशिकांत दुबे मराठी माणूस आमच्या पैशावर जगतो, असे बेताल वक्तव्य करतात, तेव्हाही मुख्यमंत्री फडणवीस त्यांचा जाहीर निषेध करीत नाहीत. निशिकांत दुबेंवर कारवाई तर दूर, पण त्यांना यापुढे मराठी माणसांबद्दल वावगे बोलू नका, असे ठणकावून सांगत नाहीत. दुबेंच्या झारखंडसह उत्तर प्रदेश, बिहार, मध्य प्रदेश, छत्तीसगड, उत्तराखंड, राजस्थान आणि पूर्वेतील सात राज्ये असा एकूण १४ राज्यांचा जीएसटी आणि एकटा महाराष्ट्र केंद्र सरकारला जो जीएसटी देतो त्याची बेरीज केली तर महाराष्ट्राचाच आकडा मोठा आहे. किमान एवढे तरी या दुबेंना भाजप नेत्यांनी सांगावे. मीरा रोड येथील मंगळवारच्या मोर्चात महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि शिवसेना (ठाकरे) गटाचे नेते, तसेच भाजप सोडून सर्वपक्षीय नेते सहभागी झाले होते. मंत्री प्रताप सरनाईक हे मराठीच्या मुद्द्यावर मोर्चात सहभागी होण्यासाठी आले होते, मात्र मोर्चेकऱ्यांचा आक्रमकपणा पाहून त्यांना काढता पाय घ्यावा लागला. या मोर्चात विविध धर्मीय लोकही मराठी भाषेसाठी सहभागी झाले होते. मात्र शासनाकडून जी दडपशाही सुरू आहे, त्याचा रोष मोर्चेकऱ्यांनी सरनाईकांवर काढला. मराठीच्या मारेकऱ्यांना सत्ताधारी राजाश्रय देत असल्याची भावना मराठी मनामनात आता पक्की होत चालली आहे, हेच यातून दिसून आले. महाराष्ट्रातच मराठी माणसाचा आवाज दाबला जाण्याचा हा प्रकार असल्याची भावना निर्माण झाली आहे.

# स्मशानभूमी नसल्याने संतप्त गावकरी
## वाशिम जिल्ह्यात प्रेत थेट ग्रामपंचायतीत ठेवलं



**■वाशिम :** वाशिम जिल्ह्यातील कारंजा तालुक्यातील एक धक्कादायक घटना समोर आली आहे. सोमठाणा गावात स्मशानभूमी नसल्यामुळे गावकऱ्यांनी प्रेत थेट सोमठाणा ग्रामपंचायत कार्यालयात ठेवून ग्रामपंचायतचा जाहीर निषेध केल्याची घटना समोर आली आहे. अनेक वर्षांपासून सोमठाणा या गावात कुठेही स्मशानभूमी नसल्यामुळे नागरिक त्रस्त आहेत. अशातच काही दिवसांपासून पावसाने देखील जोरदार हजेरी लावली आहे. सतत पडणाऱ्या पावसामुळे आणि गावात स्मशानभूमी नसल्यामुळे गावकऱ्यांनी चक्क प्रेत ग्रामपंचायत कार्यालयात ठेवून निषेध केला आहे.

**गावकरी २० वर्षांपासून त्रस्त**

सोमठाणा गावातील नागरिक गेल्या २० वर्षांपासून त्रस्त आहेत. एकही स्मशानभूमी नसल्याने अनेकदा गावकऱ्यांनी ग्रामपंचायतकडे अर्ज करून मागणी केली होती. मात्र, ग्रामपंचायतने गावकऱ्यांची मागणीकडे दुर्लक्ष केलं. त्यामुळे गावातील व्यक्तीचा मृत्यू झाल्यास अंत्यसंस्कार करण्यासाठी जागाच नसल्याने आता गावकरी त्रस्त झालेत. त्यांनी संताप व्यक्त करत थेट मयत प्रेत ग्रामपंचायतमध्ये ठेवलं. आक्रमक झालेले गावकरी पाहून ग्रामपंचायतने लवकरच स्मशानभूमी बांधून देऊ असं सांगितलं आहे.

अशातच आता सोमठाणामधील संतप्त झालेल्या गावकऱ्यांनी बुधवारी गावात मयत झालेल्या व्यक्तीचं प्रेत थेट ग्रामपंचायत कार्यालयातमध्ये ठेवून निषेध केला. त्यामुळे ग्रामपंचायत कार्यालयात काही वेळ तणावाचं वातावरण निर्माण झालं होत. त्यानंतर पोलीसांनी गावात येऊन मध्यस्ती केल्यानंतर वातावरण शांत झालं. या घटनेनंतर लवकरच स्मशानभूमी बांधण्यात येईल अशी आश्वासन दिल्यानंतर अखेर मयत व्यक्तीचं प्रेत उचलण्यात आलं.

## बीडमध्ये दफनविधीची तयारी सुरू... अचानक ऐकायला आल्या बाळाच्या किंकाळ्या...



या जगात कधी काय होईल हे सांगता येत नाही. पृथ्वीवर याआधी असे काही चमत्कार झालेले आहेत, ज्यावर आजही विश्वास ठेवणं कठीण जातं. वैद्यकीय क्षेत्रात तर कधीकधी डॉक्टरांनाही अचंबित करून टाकणारे प्रकार घडतात. सध्या बीड जिह्यातही संपूर्ण महाराष्ट्राला चकित करणारी एक अजब घटना घडली आहे. येथे मृत्यू झालेलं नवजात बाळ अचानक जिवंत झालं आहे. विशेष म्हणजे कित्येक तास शवपेटीत ठेवूनही दफनविधीच्या वेळी लोकांना बाळाचं रडणं ऐकायला आलं आहे.

**नेमकं काय घडलं?**

बीड जिल्ह्यात घडलेल्या या प्रकाराची सध्या सगळीकडे चर्चा होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार बीडमधील अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय रुग्णालयात डॉक्टरांनी एका बाळाला मृत म्हणून घोषित केले होते. आमच्या बाळाचा मृत्यू झाल्याचे समजताच त्याच्या आई-वडिलांनी हंबरडा फोडला होता. पण दफन करण्याच्या काही क्षण अगोदर ते बाळ रडायला लागल्याचे समोर आले आहे.

**नवजात बाळाचा मृत्यू झाल्याचे सांगितले पण...**

अंबाजोगाई तालुक्यातील होळ येथील एका कुटुंबातील महिलेची ७ जुलै रोजी २०२५ रोजी स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय विद्यालयात प्रसूती झाली होती. यावेळी नवजात बाळाचा मृत्यू झाला होता, असे सांगण्यात आले होते. डॉक्टरांनी सर्व तपासण्या करून तसा निर्णय देऊन टाकला होता. डॉक्टरांनीच आपले बाळ मृत असल्याचे सांगितल्यानंतर नुकतेच प्रसूत झालेल्या महिलेने आणि तिच्या पतीनेही बाळ जिवंत असल्याची आशा सोडून दिली होती.

**आजीने केला हट्ट अन्...**

त्यानंतर या बाळाला दफन करण्याची प्रक्रिया चालू करण्यात आली. विशेष म्हणजे दफन करण्याआधीच अचानक बाळाच्या किंकाळ्या ऐकायला आल्या. बाळ दफन करण्याच्या काही मिनिटे अगोदरच बाळ जिवंत झाल्याचे समोर आले. नवजात बाळाच्या आजीने बाळाचा चेहरा बघण्याचा अट्टाहास केल्याने हा सगळा प्रकार समोर आला.

**रुग्णालय प्रशासनावर गंभीर प्रश्न उपस्थित**

दरम्यान, विशेष म्हणजे हे नवजात बाळ १० ते १२ तास शव पेटीत ठेवण्यात आलं होतं. तरी ते दफनविधीच्या अगोदर जिवंत झालं. ही बाब समोर येताच नवजात बाळाला तातडीने अंबाजोगाईच्या स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या बाळावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. हा प्रकार समोर आल्यानंतर आता डॉक्टरांच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात येत आहेत. डॉक्टरांनी बाळाची नीट तपासणी केली होती का? असे विचारले जात असून याबाबत योग्य ती कारवाई करावी अशी मागणी केली जात आहे.

## आजोबा गेले, आक्रोश झाला, जळगावात अंत्यसंस्काराची वेळ आली अन् घडलं असं काही...

मृत्यू आणि जीवन यांच्यातील सीमारेषा कधीकधी इतकी धूसर होते की, त्यावर विश्वास ठेवणेही कठीण होऊन जाते. जळगाव जिल्ह्यातील धरणगाव तालुक्यातील पाळधी गावात असाच एक विचित्र आणि तितकाच हृदयस्पर्शी प्रसंग घडला. ज्यामुळे संपूर्ण गाव क्षणार्धात शोकातून आनंदात न्हाऊन निघाले. ज्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्याची तयारी सुरू होती, तेच ६५ वर्षीय आजोबा जिवंत परतल्याने अनेकांना आश्चर्याचा धक्का बसला.

गेले काही दिवस पाळधी गावातील ६५ वर्षीय रघुनाथ खैरनार हे बेपत्ता होते. कुटुंबिय आणि गावकरी त्यांच्या शोधात होते. अशातच रेल्वे रुळावर एक अनोळखी मृतदेह आढळल्याची माहिती पोलिसांना मिळाली. शरीरयष्टी, अंगातील कपडे, पायातील चप्पल आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे अंगावरील गोंदलेले खुणा या रघुनाथ खैरनार यांच्याशी इतक्या मिळत्याजुळत्या होत्या की कुटुंबियांनी तो मृतदेह रघुनाथ खैरनार यांचाच असल्याचा समज करून घेतला. यानंतर नातेवाईकांनी हंबरडा फोडला आणि गावात शोककळा पसरली.

**अंतिम संस्काराची वेळ जवळ आलीह्न**

मन हेलावून टाकणाऱ्या या प्रकारानंतर, कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करत मृतदेहाचे शवविच्छेदनही करण्यात आले. मृतदेह घरी आणण्यात आला. त्यांच्या अंत्यसंस्काराची तयारी मोठ्या लगबगीने सुरू झाली. दुःखाचा डोंगर कोसळलेल्या कुटुंबियांना



आणि गावकऱ्यांना आता फक्त अखेरचा निरोप देण्याची औपचारिकता बाकी होती. अंत्यसंस्काराची वेळ जवळ येत होती. चिता रचली जात होती, मंत्रोच्चारांनी वातावरण गंभीर झाले होते. त्याच वेळी, अचानक एक धक्कादायक दृश्य समोर आले. दारातून रघुनाथ खैरनार स्वतःच्या पायांनी चालत घरात येत असल्याचे पाहून कुटुंबातील सदस्यांना आणि उपस्थित गावकऱ्यांना मोठा धक्का बसला.

क्षणभर कुणालाच काही कळेना. डोळ्यासमोर आपल्या आजोबांचा मृतदेह समजून ठेवलेले पार्थिव आणि त्याच क्षणी जिवंत, सुखरूप परतलेले आजोबा! हे नेमकं काय घडतंय, याचा विचार करत सर्वजण अवाक् झाले. मृत्यूच्या दारातून परतलेल्या रघुनाथ खैरनार यांना पाहताच काही क्षणांपूर्वी शोकसागरात बुडालेले कुटुंब आनंदाने गहिवरले. डोळ्यातील अश्रू अचानक आनंद अश्रुत बदलले. पाळधी गावही या अनपेक्षित पुनरागमनाने हादरुन गेले. जे मृत झाले म्हणून अंत्यसंस्कार करणार होते, तेच प्रत्यक्षात परतल्याने कुटुंबियांबरोबरच ग्रामस्थांनाही आश्चर्याचा धक्का बसला.

**देव तारी त्याला कोण मारी**

गोंधळातून सुटका झाल्यानंतर, कुटुंबियांनी रघुनाथ खैरनार यांचे मोठ्या उत्साहात आणि भावनिक वातावरणात घरी औक्षण करून स्वागत केले. "आम्हाला वाटलं की... पण देव तारी त्याला कोण मारी!" अशा भावना त्यावेळी अनेकांच्या चेहऱ्यावर दिसत होत्या. आता रेल्वे रुळावर सापडलेला तो मृतदेह नेमका कुणाचा होता आणि रघुनाथ खैरनार एवढे दिवस कुठे होते? असे प्रश्न उपस्थित होत आहेत.

### व्हॉट्सअॅप ग्रुपवर ज्युनियर्सना त्रास दिला तर रॅगिंगच
## यूजीसीचा नवीन नियम काय?

**■मुंबई :** कॉलेज किंवा इतर शिक्षण संस्थांमध्ये सीनियर विद्यार्थी जेव्हा ज्युनिअर विद्यार्थ्यांना मानसिक, सामाजिक किंवा शारीरिक त्रास देतात, तेव्हा ते रॅगिंग म्हणून ओळखले जाते. ही क्रिया प्रत्यक्ष समोरासमोरच न होता ऑनलाइन जसे की व्हॉट्सअॅप ग्रुपद्वारे देखील होऊ शकते. त्यामुळेच अनौपचारिक व्हॉट्सअॅप ग्रुपच्या माध्यमातून सीनियर विद्यार्थी जर ज्युनिअर विद्यार्थ्यांना त्रास देत असतील तर त्याला रॅगिंगच म्हटलं जाणार असल्याचे विद्यापीठ अनुदान आयोगाने स्पष्ट केलं आहे. ज्युनिअर विद्यार्थ्यांना त्रास देण्यासाठी तयार केलेल्या कोणत्याही व्हॉट्सअॅप ग्रुपवर लक्ष ठेवण्याचे निर्देश यूजीसीने उच्च शैक्षणिक संस्थांना दिल्याचं संबंधित अधिकऱ्याने म्हटलं आहे.

**व्हॉट्सअॅप ग्रुपद्वारे रॅगिंग केल्यास कारवाई**

जर कोणत्याही कॉलेज किंवा इतर शिक्षण संस्थांमध्ये जर अशा प्रकारच्या व्हॉट्सअॅप ग्रुपद्वारे होणाऱ्या त्रासाला रॅगिंग समजले जाणार आहे. त्यासोबतच रॅगिंगविरोधी कायद्यांतर्गत संबंधित शैक्षणिक संस्थेविरोधात कठोर कारवाई देखील केली जाणार असल्याचं यूजीसीने त्यांच्या नवीन दिशानिर्देशांमध्ये म्हटलं आहे. यामध्ये प्रत्येक वर्षी नवीन विद्यार्थ्यांकडून यूजीसीला अनेक तक्रारी मिळत आहेत. अशातच सीनियर विद्यार्थ्यांकडून ज्युनिअर विद्यार्थ्यांना त्रास दिला जात असल्याचा आरोप नवीन विद्यार्थी करत आहेत. या प्रकरणी अनेक प्रकरणात सीनियर विद्यार्थी हे अनौपचारिक व्हॉट्सअॅप ग्रुप तयार करून ज्युनिअर विद्यार्थ्यांना मेसेज, फोन करून त्यांना मानसिक त्रास देत असल्याचं समोर आलं आहे. त्यामुळे यूजीसीने हा निर्णय घेतला आहे.

**काय म्हटलं आहे यूजीसीने?**

उच्च शैक्षणिक संस्थांमधील विद्यार्थ्यांची सुरक्षा ही सर्वात महत्त्वाची आहे. त्यामुळे या प्रकरणात कोणत्याही प्रकारची तडजोड केली जाणार नाही असं यूजीसीने स्पष्ट सांगितलं आहे. तसेच जर एखादे कॉलेज किंवा शिक्षण संस्था रॅगिंगविरोधी नियमांची अंमलबजावणी करण्यास अपयशी ठरलेल्या किंवा टाळाटाळ करणाऱ्या उच्च शैक्षणिक संस्थेचे अनुदान रोखण्यासह त्यांच्यावर कठोर कारवाई केली जाणार असल्याचं देखील यूजीसीने म्हटलं आहे.

**व्हॉट्सअॅपवर रॅगिंग कशी होते?**

सीनियरकडून ज्युनिअरना अपमानास्पद मेसेज, फोटो, जोक्स पाठवले जातात. त्यांना गप्प राहायला भाग पाडणे किंवा नको त्या गोष्टी करायला लावणे. काही वेळा अश्लील भाषेचा वापर किंवा ट्रोल करणे. हा फक्त मजा आहे या नावाखाली मानसिक छळ केला जातो.




# गणेशोत्सव महाराष्ट्राचा उत्सव म्हणून घोषित

**■मुंबई :** गणेशोत्सव आता अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. सार्वजनिक मंडळांमध्ये तर गणेशोत्सवासाठी लगबग सुरु झाली असून, मूतीर्कारही गणेशमूर्ती तयार करण्यात व्यग्र आहेत. तसंच घरच्या गणपतीची मूर्ती निवडण्यासाठी बाजारांमध्ये नागरिकांची लगबग सुरु झाली आहे. यादरम्यान गणेशभक्तांसाठी आनंदाची बातमी आली आहे. गणेशोत्सव महाराष्ट्राचा उत्सव म्हणून घोषित केला आहे. राज्याचे सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांनी विधानसभेत ही घोषणा केली आहे.

भाजपाचे कसबा पेठचे आमदार नारायण रासने यांनी गणेशोत्सव राज्य महोत्सव म्हणून घोषित करण्यात यावा अशी मागणी केली. त्यावर उत्तर देताना आशिष शेलार यांनी रासने यांचे आभार मानले. पुढे ते म्हणाले, ''महाराष्ट्राचा गणेशोत्सव १८९३ रोजी लोकमान्य टिळकांनी सार्वजनिकरित्या सुरु केला. घरोघरी तो सुरु होताच. त्याची एक पार्श्वभूमी सामाजिक, राष्ट्रीय, स्वतंत्रता, स्वाभिमान, स्वभाषा या सगळ्यांशी संबंधित होतं आणि त्याच पद्धतीन चालू आहे. त्यामुळेच महाराष्ट्राचा गौरव आणि अभिमान असलेला गणेशोत्सव महाराष्ट्र राज्याचा महोत्सव उत्सव म्हणून घोषित करेल हे मी आजच स्पष्ट करतो''.

पुढे ते म्हणाले, ''त्यांनी निबंर्धांचा उल्लेख केला. काही लोकांनी वेगवेगळ्या कारणाने गणेशोत्सवाच्या सार्वजनिक परंपरेला बाधा निर्माण करण्याचा प्रयत्न वेगवेगळ्या न्यायालयात केला. पण महायुतीच्या सरकारने या सर्व निबंर्धांना, या सर्व स्पीड ब्रेकरला बाजूला करण्याचे काम केलं. मी न्यायाधीशाचं नाव घेणार नाही, ते निवृत्त झाले आहेत. त्यांच्या माध्यमातून झालेल्या निवाड्यात जणू पोलिसांनी, महापालिकांनी परवानगीच देऊ नये यासाठी प्रयत्न सुरु होता''. रस्ते, मैदानं, नागरी वस्त्या निर्मित होण्याऐवजी तिथे सार्वजनिक गणेशोत्सव साजरे होत होते. तरीही ती कारणं देत तिथे आडकाठी आणण्याचा प्रयत्न केला असाही दावा त्यांनी केला.

आपल्या गणेशोत्सवाच्या बाबतीत महायूती सरकारने भूमिका घेतली असून पोलीस सुरक्षा असेल, आवश्यक इन्फ्रास्ट्रक्चरवरचा खर्च असेल, कसबामध्ये आणि विशेषता पुण्यातला महोत्सव असेल मुंबईतला असेल, पूर्ण राज्यातला असेल त्यासाठी लागतील तेवढा निधी राज्य सरकार खर्च करेल. कारण गणेशोत्सव उत्साहाने साजरा करणे ही महायुतीची आणि या शासनाची भूमिका आहे. सर्व गणेशोत्सव मंडळांना यानिमित्ताने माझी विनंती आहे की आपण जे वेगवेगळे देखावे करतात त्यामध्ये आपले सैन्य,सैनिक, सामाजिक उपक्रम, ऑपरेशन सिंदूर, देशांतर्गत विकासाची कामे, आपले महापुरुष अशा सगळ्या गोष्टींच्या विचार करावा. सामाजिक भान, पर्यावरणपूरक आणि उत्साहात साजरा होणारा हा गणेशोत्सव हा महाराष्ट्र राज्याचा महोत्सव म्हणून घोषित करताना आम्हाला



पीओपीच्या परंपरागत मूर्तीवर बंदी आणताना सीपीसीबीच्या गाईडलाईन्सचा तत्कालीन सरकारच्या काळातल्या सरकारने बाऊ केला गेला. त्यानंतर पीओपी मूर्तीच्या बाबतीमध्ये पर्यावरण पूरक अन्य पयार्यांना समोर ठेवून पीओपी पर्यावरणाला घातक आहे की नाही, या विषयावर सखोल अभ्यास करण्याची भूमिका आमच्या विभागाने घेतली. आणि राजीव गांधी विज्ञान आयोगामार्फत काकोडकर समितीचा अहवाल घेतला. केंद्रीय मंत्री भूपेंद्र यादवजी यांनी संमती दिली आणि जे निर्बंध होते तेही बाजूला निघाले. न्यायालयाच्या निवाड्यानुसार पीओपी मूर्ती बनवणे, डिस्प्ले करणे आणि विकणे यालाही परवानगी मिळाली असंही त्यांनी सांगितलं.

## कोपरखैरणेतील अंतर्गत रस्ते अद्यापही खड्डेमय



**■नवी मुंबई :** कोपरखैरणे परिसरातील अंतर्गत जागोजागी खड्डे, राडारोड्याचे ढिगारे, उघड्या भूमिगत केबल्स आणि अपूर्ण डागडुजीमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. पावसाने जोर धरल्याने हे रस्ते प्रवासासाठी अधिकच धोकादायक ठरत असून, यंदाही खड्ड्यांचे साम्राज्य निर्माण होणार, अशी भीती व्यक्त होत आहे. कोपरखैरणे नोडमधील वाशी-कोपरखैरणे मुख्य रस्ता वगळता बहुतेक सर्व अंतर्गत रस्ते डांबरी आहेत. सध्या मुख्य मार्गावर कामे वेगात सुरू असली तरी अंतर्गत रस्त्यांकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप स्थानिकांकडून केला जात आहे. सेक्टर १९ अ, इ, उ तसेच सेक्टर ६, ७, ८ या भागांत तात्पुरत्या स्वरूपात मिक्श्चर टाकून खड्डे बुजवण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, स्वच्छता न ठेवता मातीवरच मिश्रण टाकण्यात आल्याने ते पुन्हा उखडले आहे, असा आरोप रहिवासी संग्राम कामत यांनी केला. अनेक ठिकाणी भूमिगत केबल टाकताना पुरेशी काळजी घेतली जात नसल्याने त्या उघड्या अवस्थेत आल्या आहेत. त्याचप्रमाणे, बांधकाम स्थळांवरील राडारोडा थेट रस्त्याच्या कडेला टाकल्याने रस्त्यांवर अडथळे निर्माण होत आहेत. हे सर्व प्रकार नागरी सुरक्षेच्या दृष्टीने गंभीर ठरत आहेत. सेक्टर १ ते ४, १५ ते १८ आणि बोनकोडे गावठाण या भागांतील अंतर्गत रस्त्यांवर खड्ड्यांची संख्या वाढत आहे. राडारोड्यावर मिक्श्चर टाकल्यामुळे काही ठिकाणी रस्त्याच्या मधोमध उंच भाग निर्माण झाला असून, तो गतिरोधकासारखा ठरत आहे. अशा ठिकाणी वाहनधारकांना अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. कोपरखैरणे विभागाचे अभियंता संतोष शिकतोडे यांनी सांगितले की, पावसाळ्यापूर्वीची जवळपास ७० टक्के कामे पूर्ण झाली आहेत. मान्सूनपूर्व पावसामुळे काही दिवस काम मंदावले होते. मात्र, आता उघडीप मिळाल्याने अंतर्गत रस्त्यांवरील खड्डे बुजवण्याचे आणि डांबरीकरणाचे काम वेगात सुरू असून लवकरच ही कामे पूर्ण होतील.

# मराठी माणसालाही जमणार नाही ते एका पंजाबी पोरानं करून दाखवलं
## "मी जरी पंजाबी असलो तरी माझे येथील संस्कार मराठी आहेत आणि मी मराठीच बोलतो"




**■मिरज :** सध्या महाराष्ट्रात मराठी आणि हिंदी भाषेवरुन वाद सुरु आहे. त्यातच महाराष्ट्राच्या राजकारणात आणि समाजकारणात सध्या भाषिक वादाचे पडसाद उमटत आहे. त्यातच मिरजेतून एक अत्यंत प्रेरणादायी आणि सकारात्मक बातमी समोर आली आहे. मिरजेच्या महाराणा प्रताप चौकात एक पंजाबी तरुण अक्षरशः मराठीच्या स्वाभिमानासाठी रस्त्यावर उतरला आहे. त्याच्या या कृतीने अनेकांना थक्क केले आहे. दलजितसिंग रामगडिया असे या तरुणाचे नाव आहे.

राज्यात मराठी विरुद्ध अमराठी असा वाद पेटलेला असताना, दलजितसिंग रामगडिया हे एक पोस्टर घेऊन मिरजेतील महाराणा प्रताप चौकात उभे राहिले. यावेळी त्यांनी या पोस्टरवर मी पंजाबी, पण मी महाराष्ट्राचा! मी मराठीच बोलतो, मला मराठी भाषेचा अभिमान आहे, असे म्हटले आहे. त्यांच्या या कृतीने एकतेचा संदेश दिला आहे. भर चौकात त्यांनी ज्या आत्मविश्वासाने मराठीचा अभिमान व्यक्त केला, ते पाहून उपस्थित नागरिक केवळ कुतूहलाने पाहायला लागले. तर त्यांनी दलजितसिंग यांच्या भूमिकेला दाद दिली. अनेकांनी त्यांच्याभोवती गर्दी करुन या अनोख्या घटनेचे साक्षीदार होण्याचा आनंद घेतला.


**मिरज शहराचे पंजाबीशी कनेक्शन काय?**

मिरज शहरात अनेक पंजाबी कुटुंबे गेल्या अनेक वर्षांपासून व्यवसायानिमित्त स्थायिक झाली आहेत. या कुटुंबांनी केवळ व्यवसायच केला नाही, तर येथील मराठी संस्कृतीशी ते पूर्णपणे एकरूप झाले आहेत. ही मंडळी अस्खलित मराठी बोलतात, इतकेच नाही तर मराठी सण-उत्सवांमध्येही ते तितक्याच उत्साहाने सहभागी होतात. दलजितसिंग यांचे कुटुंब १९७० पासून मिरजेत वास्तव्यास आहे. त्यांच्या औद्योगिक वसाहतीत वे-ब्रिजचा व्यवसाय आहे. विशेष म्हणजे, त्यांच्या कुटुंबाच्या दोन पिढ्या मराठी शाळेत शिकल्या आहेत. त्यासोबतच आता त्यांची तिसरी पिढीही मराठी शाळेतच शिक्षण घेत आहे. ही बाब त्यांच्या मराठी भाषेवरील निष्ठेची आणि महाराष्ट्राशी असलेल्या घट्ट नात्याची प्रचिती देते.

**मराठी ही आपली मातृभाषा**

दलजितसिंग रामगडिया यांनी केलेल्या कृतीतून केवळ मराठी भाषेवरील प्रेमच पाहायला मिळत नाही, तर त्यांनी कशाप्रकारे स्थानिक संस्कृतीशी जुळवून घेतले आहे हे देखील दिसत आहे. ''मी जरी पंजाबी असलो तरी माझे येथील संस्कार मराठी आहेत आणि मी मराठीच बोलतो,'' असे दलजितसिंग रामगडिया हे मोठ्या अभिमानाने सांगतात. इतकेच नाही, तर त्यांनी ''मराठी ही आपली मातृभाषा आहे, आपण सर्वांनी मराठीतच बोला.'', असे आवाहन महाराष्ट्रातील प्रत्येक नागरिकाला केले आहे. दलजितसिंग यांच्या कृतीने त्यांचे कौतुक केले जात आहे.

### ऑनलाईन गेममध्ये १२०० रुपये हरला
## नाशकात धसक्याने १६ वर्षांच्या मुलाने जीवन संपवले



**मोबाईल गेमपासून मुलांना दूर ठेवावं**

गेल्या काही दिवसांपासून सायबर फ्रॉडच्या घटना वाढतच आहेत. कोणताही गेम खेळताना एका प्रमाणाच्या बाहेर कधीच पैसे जिंकू शकत नाही ही सिस्टीम त्या मोबाईल गेम अॅपमध्ये नियोजित केलेली असते त्यामुळे अशा गेमपासून आपण आपल्या मुलांना दूर ठेवावं असे सायबर तज्ञ भूषण देशमुख यांनी म्हटले आहे.

**■नाशिक :** ऑनलाईन गेमच्या आडून खेळल्या जाणाऱ्या जुगाराने एका सोळा वर्षांच्या मुलाचा बळी गेला आहे. लहान मुलांना मोबाईलने कसे नादाला लावले असल्याचा हा धक्कादायक प्रकार उघडकीस आल्याने सर्वत्र चिंता व्यक्त होत आहे. नाशिकच्या सम्राट भालेराव या १६ वर्षांच्या मुलाने मोबाईलवर गेम खेळताना अचानक विंजो मोबाईल गेम अॅप डाऊनलोड करीत त्यावर १२०० रुपये हरला. त्यानंतर घाबरुन त्याने स्वतः गळफास घेत लाखमोलाचे आयुष्य संपवल्याची घटना उघडकीस आली आहे.

सम्राट भालेराव या हा दोन बहिणींच्या पाठीवरती एकुलता एक असलेला मुलगा गमावल्याने आई-वडीलांनी टाहो फोडला आहे. त्याने त्याच्या आईच्या मोबाईलमध्ये विंजो मोबाईल गेम अॅप डाऊनलोड केला होता. त्यावर खेळताना त्याने १२०० रुपये गमावले, त्यातून तो नैराश्यात गेला आणि त्याने गळफास लावून आत्महत्या केली. त्याच्या अशा आत्महत्येने सगळं कुटुंब हादरले आहे.

फायदा होतो म्हणून सम्राट हा गेम खेळत गेला. त्याला काही प्रमाणात पैसेही मिळाले त्यातून तो चैनीच्या वस्तू खरेदी करीत गेला. मात्र एका विशिष्ट काळानंतर मात्र तो या गेममध्ये पैसे हरू लागला. त्यानंतर त्याने आपल्या कुटुंबियांकडून देखील पैसे घेऊन हा गेम खेळणे सुरूच ठेवले. त्यामुळे या ऑनलाईन गेममध्ये लहान मुलं आणि तरुण सुरुवातीला मिळणाऱ्या पैशाच्या लालसेपोटी अडकत जातात आणि नंतर मात्र एका विशिष्ट स्टेपनंतर या ऑनलाइन गेममध्ये पैसे हरू लागतात. त्यामुळे पालकांनी आपल्या मुलांकडे लक्ष द्यायला हवं असे सायबर तज्ञांनी म्हटले आहे.


हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय झ गाळा नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र), वेथे छापून २, राजाराम सी.एच.एस. लिमिटेड, बंदरवाडी, नवघर रोड, भाईंदर (पुर्व), जिल्हा ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिध्द केले. संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमान पत्रात प्रसिध्द होणाऱ्या बातम्या/लेख/जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक आणि जाहिरात प्रतिनिधी यांच्यावर राहील.) भ्रमणध्वनी ८४२४९८९८९८. Email ID: policebatmipatra@gmail.com

Printed, Published and owned by Mr.Dr. Deepak MoreshwarNaik Printed at SOMANI PRINTING PRESS, OFFICE UNIT NO. 4, N.K.INDUSTRIAL ESTATE, NEAR PRAVASI INDUSTRIAL ESTATE, GATE NO. 2, GOREGAON (E), MUMBAI 400063, MAHARASHTRA, Published At 2, RajaramChs. Ltd., Bunderwadi, Navghar Road, Bhayander(E), Dist - Thane, Pincode 401105, Maharashtra. Editor Mr. Dr. Deepak Moreshwar Naik. Mo.8424989898, Email ID: policebatmipatra@gmail.com